जा.क्र.२००५/पुनर्वसन/कक्ष-१/सिआर-२१
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
दिनांक :- ०५ /०४/२००५

**महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये कलम ११ (१) ची अधिसूचना:-**

(१) क्रमांक २००५/पुनर्वसन/कक्ष-१/सिआर-२१ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद असे जाहिर करतो की, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन १९९९ च्या अधिनियमातील तरतुदी या द्वारे लातूर जिल्हयाच्या जळकोट तालुक्यातील सोनाळा साठवण तलावाच्या उक्त अधिनियमाच्या कलम (१) खंड (अ) व खंड (ब) च्या तरतुदींच्या अनुरोधाने उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. त्या प्रकल्पाच्या संबंधात या द्वारे--

(अ) उक्त प्रकल्पाच्या बाधीत किंवा लाभधारक परीमंडळामध्ये येण्याची शक्यता आहे असे गांव खालील प्रमाणे विनिर्दीष्ट करीत आहे --

(एक) बाधित परिमंडळात येण्याचा संभव असणारी गांवे --

| अ.क्र. | गावाचे नांव | जिल्हा | तालुका |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | सोनाळा | लातूर | जळकोट |
| २ | कंरजी | लातूर | जळकोट |
| ३ | विराळ | लातूर | जळकोट |
| ४ | ढोरसावंगी | लातूर | जळकोट |

(दोन) लाभधारक परिमंडळात येण्याचा संभव असलेली गांवे --

| अ.क्र. | गावाचे नांव | जिल्हा | तालुका |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | सोनाळा | लातूर | जळकोट |
| २ | कंरजी | लातूर | जळकोट |
| ३ | विराळ | लातूर | जळकोट |
| ४ | ढोरसावंगी | लातूर | जळकोट |
| ५ | लाळी | लातूर | जळकोट |

(ब) वरील परिच्छेद "अ" मधील (एक) आणि (दोन) मध्ये नमूद केलेल्या गांवातील एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण धारण क्षेत्राला किंवा त्यांच्या भागाला लागू असल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध अशा गावातील किंवा क्षेत्रातील निर्देशीत धारण क्षेत्राला तात्पुरते लागू होतील. मात्र संबंधीत परिमंडळातील त्यांच्या एकूण धारण जमीनीचे क्षेत्र ३.२३ हे.आर. पेक्षा कमी असता कामा नये.

(२) सदर अधिसूचना ही या अधिसूचनेत विनिर्दीष्ट केलेल्या अशा बाधीत व लाभक्षेत्रातील क्षेत्रांना लागू होणार नाही ज्यांच्या क्षेत्रा बाबतीत भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत सदर क्षेत्राच्या भूमीसंपादनाबाबत किंवा प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कलम ४ अंतर्गत अधिसूचना निर्गमीत झाली असेल.

**( कृ.भि.भोगे )**
**विभागीय आयुक्त,**
**औरंगाबाद.**